हिंगणा नगर पंचायत हिंगणा, जिल्हा- नागपूर

परिशिष्ट डी-१

बांधकाम परवानगी मंजुरी व प्रारंभ प्रमाणपत्र

(प्लींथ लेव्हलपर्यंत)

न.पं.हिं/जा.क्र. 762 /2019
कार्यालय नगर पंचायत हिंगणा
दिनांक 24 /05 /2019

प्रति,
श्रीमती. वंदना गोपालराव धवड
रा. नागपूर

विषय:- निवासी बांधकामास परवानगी बाबत.

संदर्भ:- आपला बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्ज दिनांक ०३/०३/२०१८

आपले संदर्भांकित बांधकाम परवानगी मिळणेबाबत **अर्ज क्र ४०८ दिनांक ०३/०३/२०१८** अन्वये आपण महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ चे कमल १८९ अन्वये अर्ज सादर केला आहे. उपरोक्त अर्जाचे अनुषंगाने हिंगणा नगर पंचायत हद्दितील प्रभाग/वार्ड नाव/क्रमांक **१६ शुभलक्ष्मी डेव्हलपर्स लेआऊट मालमत्ता क्रमांक ३९०३/५५, ५६, ५७, ५८, ५९ सिटी सर्व्हे -, शिट क्रमांक - चालता/लगर भुमापन क्रमांक - शे. सर्व्हे क्र. १३८, १३९ प्लॉट क्र. ५५, ५६, ५७, ५८ , ५९** मधील आपल्या मालकीच्या जागेवर **१) प्लॉट चे एकुण क्षेत्रफळ २२६१. ६४५ चौ.मी. २) तळमजला ७५३.१३६ चौ.मी. ३) पहिला मजला १०११.७२४ चौ.मी., २) दुसरा मजला ३९१.५५८ चौ.मी., ३) तिसरा मजला ३९१.५५८ चौ.मी. , ४) चौथा मजला ३९१.५५८ चौ. मी., असे एकुण २९३९.५३४ चौ.मी. 'प्लींथ लेव्हल पर्यंत (जोता बांधकाम)'** बांधकाम करण्यास महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये प्रारंभ प्रमाणपत्र खालील अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.

१. या प्रारंभ प्रमाणपत्रानुसार प्रस्तावीत इमारतीचे बांधकाम फक्त **'प्लींथ लेव्हलपर्यंत' (जोता बांधकाम)** करण्यास परवानगी देण्यात येत आहे. मंजुर बांधकाम परवानगी नकाशाप्रमाणे प्लींथ लेव्हल पर्यंत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सदर इमारतीचे सुपरविजन (देखरेख) करणाऱ्या लायसन्स इंजीनिअर यांनी परिशिष्ट एफ मधील नमुन्यात त्याबाबतची सुचना नगर पंचायतला द्यावी लागेल. त्यानंतर नगर पंचायत व्दारा प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी करून झालेले बांधकाम, परवानगी प्रमाणे निदर्शनास आल्यानंतर पुढील बांधकामाकरीता विहीत नमुन्यामध्ये बांधकाम परवानगी देण्यात येईल.
२. बांधकामास लागणारे साहीत्य स्वत:च्या जबाबदारीवर व स्वत:चे जागेवर ठेवावे लागेल.

३. बांधकाम परवानगी मंजुरी तारखेपासून १ (एक) वर्षाकरिता ग्राहय राहील व त्यास तीन वेळा मुदतवाढ देण्यात येईल. मुदतीच्या आत बांधकाम सुरू करून पूर्ण करणे शक्य नसल्यास मुदतीच्या आत मुदतवाढीसाठी एक महिण्यापुर्वी अर्ज करून परवानगी घ्यावी लागेल.

४. बांधकाम साहित्य रस्ते, गटारे, सार्वजनिक उपयोगाच्या व राहदारीच्या जागेवर ठेवता येणार नाही. राहदारीच्या जागेवर वा गटारावर बांधकाम साहित्य टाकल्यास पुर्व सुचना न देता महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १७९ अन्वये कार्यवाही करून हटविण्यात येईल.

५. मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक आहे. तसे करीत नसल्याचे आढळल्यास महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३,५४ तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायत व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

६. कोणत्याही स्वरूपाचा वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. आपल हक्क संबंध पाहुन बांधकाम करावे.

७. वेळोवेळी शासनाकडुन ज्या अटी व शर्ती लागू होतील त्या आपणास बंधनकारक राहील.

८. बांधकामास सुरूवात करतेवेळी कमीम कमी ४ वृक्ष लावणे आपणावर बंधनकारक राहील. प्लींथ लेवलनंतर पुढील बांधकाम परवानगी देते वेळी परील अटीची पुर्तता तपासण्यात येईल.

९. बांधकाम हाती घेण्यापुर्वी अधिकृत स्ट्रक्चरल डिझाईनर कडुन स्ट्रक्चरल डिझाईन तसार करवुन घ्यावे व त्याची एक प्रत नगर पंचायत कार्यालयास सादर करावी.

१०. इमारतीचे डिझाईन भारतीय मानक ब्युरो ने भुकंप रोधक बांधकामाचे संदर्भात विहीत केलेल्या तरतुदीनुसार पुर्तता करण्याची जबाबदारी आपली आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना/नैसर्गीक आपत्ती झाल्यास होणाऱ्या नुकसानास आपण जबाबदार राहाल.

११. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीबी-४३१२/युओआर २५९/नवि-११/दिनांक १०/०१/२०१२ अन्वये इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार यांचे संदर्भात कामगार विभागाने निर्गमीत केलेले नियम/परिपत्रक/प्रचलीत आदेश याची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी मालकाची आहे. यात अनियमितता आढळल्यास होणाऱ्या कार्यवाहीस आपण मालक जबाबदार राहाल.

१२. इमारतीचे बांधकामस सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्पेशिफीकेशन प्रमाणे करण्याची जबाबदारी आपली राहील.

सहपत्र:- प्लींथ लेव्हल पावेतो बांधकाम मंजुरी नकाशा-१

—

नगर पंचायत हिंगणा

— मुख्याधिकारी
नगरपंचायत हिंगणा

प्रतिलीपी:- १) मा. जिल्हाधिकारी नागपूर
२) मा. सहाय्यक संचालक, नगर रचना शाखा कार्यालय, नागपूर

— वा —
मुख्याधिकारी
नगरपंचायत हिंगणा